0001

<u>नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर</u>

**वाचावे :-** १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक २५/०३/२०१३ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२३/२०१३/जा.२७०, दिनांक २६/०३/२०१३ व १२/०४/२०१३.

३) मे. वेलानी अँड कंपनी यांचे दिनांक २८/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

४) पोलिस उपनिरिक्षक व तपासी अधिकारी, डोंगरी पोलिस ठाणे, मुंबई यांचे दि. ०२/०५/२०१३ रोजी टपामालार्फत प्राप्त अभिवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२३/२०१३/जा. ४८९
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इशुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : ३१/०५/२०१३.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

## आ दे श

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक १२/०३/२०१३ रोजी मे. वेलानी ॲण्ड कंपनी, ८०, जीवराज भानजी शाह मार्ग, खडक, मुंबई ४०० ००९ यांचे परवाना क्र. ३ अ १९ (खाद्यतेल) तसेच ३ अ २० (वनस्पती) या परवानाधारकाची तपासणी करावयाची असल्याने उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ, परेल यांचे अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी पंचासह उपरोक्त पत्त्यावर जात असताना, ६०, जीवराज भानजी शाह मार्ग, खडक, मुंबई ४०० ००९ या दुकानात खाद्यतेलाची ने-आण सुरु असल्याचे दिसून आल्यावरुन अधिकाऱ्यांनी सदर दुकानात भेट दिली. त्याअनुषंगाने सदर गोडाऊन (दुकान) मध्ये उपस्थित व्यक्तीस अधिकाऱ्यांनी त्यांची ओळख दाखवून पंचांसमक्ष चौकशी केली असता, चौकशीअंती सदर दुकानामध्ये उपस्थित व्यक्तीने त्याचे नांव सिराज हसनअली वेलानी असल्याचे सांगून ते मे. वेलानी ॲण्ड कंपनीचे मालक असल्याचे सांगितले. सदर पत्त्यावर खाद्यतेल व वनस्पती (तूप) ने-आण व खरेदी विक्रीबाबत सदरच्या पत्त्यावर परवाना सादर करण्याच्या सुचना उपस्थित व्यक्ती सिराज हसनअली वेलानी यांना

0002

केल्या असत्या, त्यांनी सदरच्या पत्त्यावर कोणतेही परवाने नसल्याचे सांगून त्यांच्याच बाजूला असलेले मे. वेलानी ॲण्ड कंपनी, ८०, जीवराज भानजी शाह मार्ग, खडक, मुंबई ४०० ००९ या पत्त्यावरील घाऊक परवाना त्यांनी सादर केला. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष पुढील चौकशी केली असता, त्यांना मंजूर केलेला परवाना हा ८०, जीवराज भानजी शाह मार्ग, खडक, मुंबई ४०० ००९ या पत्त्यावरील असून भेट दिलेल्या ठिकाणी म्हणजेच ६०, जीवराज भानजी शाह मार्ग, खडक, मुंबई ४०० ००९ येथे खाद्यतेल व वनस्पतीचा परवाना नसल्याचे पथकास आढळून आल्याने सदर ठिकाणी ते विनापरवाना व्यवसाय करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसून आले. प्रचलित पध्दतीनुसार मे. वेलानी ॲण्ड कंपनीचे मालक/भागीदार यांनी खाद्यतेलाची साठवणूक परवान्यावरील पत्त्यावर न करता त्यांनी गाळा क्र. ६० या अलाहिदा पत्त्यावर साठवणूक करीत असल्याने त्यांनी अनुज्ञप्ती प्राधिकारी यांना अतिरिक्त गोदामासाठी अर्ज करुन परवान्यावर अतिरिक्त गोदामाची नोंद करुन घेणे आवश्यक होते. परंतू त्याकरिता त्यांनी अर्जही केला नसल्याचे पथकास आढळून आले. याबाबत अधिक विचारणा केली असता, मे. वेलानी ॲण्ड कंपनीचे मालक/भागीदार सिराज हसनअली वेलानी यांनी त्यांना कल्पना नसल्याचे सांगितले. तदनंतर अधिकाऱ्यांनी त्यांच्या व पंचांसमक्ष गाळा क्र. ६०, जीवराज भानजी शाह मार्ग, खडक, मुंबई ४०० ००९ येथे असलेल्या साठ्याची मोजदाद केली असता, तो खालील प्रमाणे आढळून आला.

| अ. क्र. | कंपनीचे नाव | किलोचे डबे | एकूण डबे/ बरणी | दर (प्र.लि.) रुपये | एकूण लिटर/ किलो | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राज ऑईल मिल | १५ लिटर (बरणी) | ३११ | १४१/- | ४६६५ | ६,५७,७६५/- |
| २ | गोंदरेज | १५ किलो (बरणी) | २१ | १२१/- | ३१५ | ३८,११५/- |
| ३ | लिबर्टी | १० लिटर (पामोलीन) | ४३ | ५०/- | ४३० | २१,५००/- |
| ४ | लिबर्टी | १२ लिटर (सनफ्लावर) | ४३ | ८०/- | ५१६ | ४१,२८०/- |
| ५ | लिबर्टी | २० लिटर (सन-डे) | ०८ | ८०/- | १६० | १२,८००/- |
| ६ | भुंगे | १० किलो (भुंगे) | ०२ | ६०/- | २० | १,२००/- |
| ७ | राज ऑईल | १५ लिटर (बरणी) | ०९ | ९०/- | १३५ | १२,१५०/- |
| एकूण | | | ४३७ | | ६२४१ | ७,८४,८१०/- |

उपरोक्त मोजदाद केलेला खाद्यतेलाचा साठा हा जागीच जप्त करण्यात आला.

तदनंतर अधिकारी यांनी पंचांसमक्ष मे. वेलानी ॲण्ड कंपनी, ८०, जीवराज भानजी शाह मार्ग, खडक, मुंबई ४०० ००९ येथे तपासणीसाठी भेट दिली असता, सदर पत्त्यावर नोकर धीरुभाई जोशी हा हजर होता. त्यांना अधिकाऱ्यांनी स्वत:ची व पंचांची ओळख करुन देऊन साठा स्थितीबाबत विचारणा केली असता, याबाबत त्याला काहीच माहित नसून बाजूला त्याचे मालक सिराज ह. वेलानी यांना सर्व माहित असल्याचे सांगितले. त्याअनुषंगाने अधिकाऱ्यांनी सदर बाबत त्यांना विचारणा केली असता, या गोडाऊनचा व्यवहार सुध्दा तोच बघतो, असे सिराज

वेलानी यांनी सांगितले. सदर दुकानाची पाहणी केली असता, सदर गोडाऊनमध्ये कुठल्याही प्रकारचे कार्यालय (ऑफिस) आढळले नाही. त्याअनुषंगाने त्यांना मंजूर केलेल्या परवान्यावर कार्यालयाचे कामकाज का करीत नाही, याबाबत अधिकाऱ्यांनी विचारणा केली असता, सदरचे कामकाज ते बाजूला ६०, जीवराज भानजी शाह मार्ग, खडक, मुंबई ४०० ००९ येथे करीत असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यानच्या काळात शिधावाटप कार्यालय क्र. १५-अ येथील दोन शिधावाटप निरीक्षक घटनास्थळी हजर झाले. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष ८०, जीवराज भानजी शाह मार्ग, खडक, मुंबई ४०० ००९ गोडाऊनमधील साठा स्थितीचे मोजदाद केली असता, खालील प्रमाणे साठा आढळून आला.

| अ.क्र. | तेलाचा प्रकार | १५ किलोचे डबे | एकूण लिटर/कि.ग्रॅ. |
|---|---|---|---|
| १ | सर्व प्रकारेच खाद्यतेल | २४७९ | ३७१८५ कि.ग्रॅ. |
| २ | वनस्पती (तूप) | ५७८ | ८६७० कि.ग्रॅ. |

अधिकाऱ्यांनी सिराज हसनअली वेलानी यांना सदर व्यवसायाच्या संबंधाविषयी विचारले असता, तो सदर व्यवसायाचा भागीदार असून परवान्यामध्ये त्याचे नाव नसल्याबाबत त्याला काहीच कल्पना नाही. सदर व्यवसाय हा त्यांच्या पूर्वजन काळापासून असल्याचे सांगितले. याबाबत प्रकरणी घडलेल्या परिस्थितीचा त्यांचा लेखी जबाब नोंदविण्यात आला.

साठास्थिती अनुज्ञेय मर्यादेच्या आत असले तरी परवानाधारकाने नेमून दिलेले नियमांचे पुढीलप्रमाणे पालन केल्याचे दिसून आले नाही. १) साठा नोंदवही अनुज्ञप्ती (परवाना) अद्यावत केलेली नाही. २) सर्व प्रकारचे देयक (बिल) सादर करु शकले नाही. ३) नमुना ड म्हणजेच पाक्षिक व मासिक विवरणपत्र सादर केलेले नाहीत. ४) भावफलक (दर फलक) दर्शनीभागीं लावलेले नाही. ५) आवश्यक असलेले इतर परवानेही सादर करु शकले नाही.

दरम्यानच्या काळात संबंधित पोलिस ठाणे येथे जाऊन घटनास्थळी घडलेली घटना सांगितल्यानंतर श्री. सौदागर गोरोबा कांबळे, पो. शिपाई ब.क्र. ३४३५, डोंगरी पोलिस ठाणे घटनास्थळी चौकशीकरिता हजर झाले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष ६०, जीवराज भानजी शाह मार्ग, खडक, मुंबई ४०० ००९ येथे परत जाऊन तपासणी केलेल्या साठ्याबाबत दस्तऐवज विचारले असता, ते सदरचे दस्तऐवज सादर करुन शकले नाहीत.

अशाप्रकारे संबंधीत आरोपीतांनी त्यांचे खाद्यतेलाच्या व्यवसायाच्या दरम्यान विनापरवाना असलेल्या जागेत तसेच योग्य त्या ठिकाणी साठा न करता अन्य ठिकाणी साठा ठेऊन कार्यालय स्थापन न करता खरेदी विक्रीचा व्यवसाय केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याने, संबंधिताविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० तसेच महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश,

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE ...AI

0004

१९९८ चे खंड ०४(२), २(अ), २(ब), ३(१), अबकड ४(१), (२), १२, १३ च्या तरतुदींचा तसेच सदर आदेशान्वये देण्यात आलेल्या परवान्यामधील अटी व शर्तीचा भंग केल्याने, डोंगरी पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.क्र. ०९/२०१३, दिनांक १३/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक १०/०४/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १०/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच मे. वेलानी अँड कंपनीचे भागीदार सिराज हसनअली वेलानी हे उपस्थित राहिले नाहीत. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २९/०४/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २९/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस मे. वेलानी अँड कंपनीचे भागीदार सिराज हसनअली वेलानी यांनी उपस्थित राहून यापूर्वी वाचावे क्र. ३ अन्वये टपालामार्फत सादर केलेले निवेदन कायम असल्याचे सांगितले. तसेच सदर प्रकरणी त्यांनी परवान्यावरील नमूद ठिकाणा व्यतिरिक्त इतर ठिकाणी साठा ठेवल्याचे कबूल केले. सदर सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी हे उपस्थित राहिले नाहीत.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

मे. वेलानी अँड कंपनी यांचे दिनांक २८/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, ते विविध ब्रॅन्डच्या खाद्यतेलाची आणि नामांकित ब्रॅन्डच्या वनस्पतीची घाऊक व्यापारी आहेत. सदर व्यवसायाकरीता त्यांचेकडे ओ.डी.एल. आणि व्हि.डी.एल. चे अनुक्रमे ३-अ-१९ व ३-अ-२० असे वैध परवाने असून ते दिनांक ३१/१२/२०१३ पर्यंत विधिग्राह्य आहे. सदरचे परवाने ८०, जे.बी. शहा मार्ग, खडक, मुंबई ०९ या पत्त्यावर आहेत. त्यांचे प्रशासकीय कार्यालय ६०, जे.बी. शहा मार्ग येथे असून सदर कार्यालय हे वरील नमूद गोदामापासून जवळ असून १०० ते १२० फुट अंतरावर आहे. सद्य:स्थितीत नजिकच्या काळात त्यांचे ८०, जे.बी. शहा मार्ग या गोदामात उंदरांचा प्रादुर्भाव जास्त झाल्याने व त्यामुळे खाद्यतेलाच्या साठ्याची नासधुस होत असल्याने त्यांनी १५ लिटर व १

लिटर क्षमतेच्या प्लॅस्टिक पॅकबंद बॉक्समध्ये साठा हा जवळच असलेल्या त्यांच्या कार्यालयात विविध खरेदीदारांना वितरणासाठी ठेवण्यात आला होता. दिनांक १३/०३/२०१३ रोजी शिधावाटप अधिकारी यांनी त्यांच्या आस्थापनेच्या जागी भेट दिली असता, त्यांना सदरची बाब निदर्शनास आली की, त्यांनी परवान्यावरील नमुद पत्त्या व्यतिरिक्त इतर ठिकाणी खाद्यतेलाच्या साठ्याची साठवणूक केली आहे. सदरची चुक त्यांच्याकडून अनावधानाने झाली असून पथकाने प्रशासकीय कार्यालयातील म्हणजेच ६०, जे.बी. शहा मार्ग येथील साठा जप्त करुन त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात येऊन पुढील आदेशापर्यंत जतन करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. सदरची चुक त्यांना मान्य असल्याचे नमुद करुन जप्त साठा मुक्त करण्याची विनंती केली. तसेच प्रशासकीय कार्यालय असलेली जागा अतिरिक्त गोदाम म्हणून परवान्यामध्ये समाविष्ठ करण्यात येईल. तपासणीच्या दिवशी सुमारे ४६ टन साठा हा ८०, जे.बी. शहा मार्ग येथे आणि ८०.५ टन साठा हा ६०, जे.बी. शहा मार्ग येथे असून त्याचा लेखा जोखा हा संगणकात जतन केला आहे. सदर खाद्यतेलाचा व्यवसाय ते सन १९६० पासून करीत असून भविष्यात सर्व अभिलेख आणि लेखा जोखा हा अद्यावत ठेवण्यात येईल, असे नमूद केले आहे.

पोलिस उपनिरिक्षक व तपासी अधिकारी, डोंगरी पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक ०२/०५/२०१३ रोजी टपामालार्फत प्राप्त अभिवेदनात, नमुद गुन्हा नोंद झाल्यानंतर यातील नमुद आरोपीस तात्काळ अटक करण्यात येऊन विहित वेळेत मा. अति. मुख्य महानगर दंडाधिकारी, २ रे न्यायालय, माझगांव, मुंबई यांचे समक्ष रिमांड कामी हजर केले असता, त्यांनी त्यास जामीनावर मुक्त करुन मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करे पर्यंत, पोलिस ठाणेस आठवड्यातून एक वेळा हजेरी देयाबाबतचे आदेश केलेले आहेत. नमुद गुन्ह्यातील जप्त व शिधावाटप पथक यांनी त्याच वेळी आरोपीतास सुपुर्त नाम्याद्वारे ताब्यात दिलेला मुद्देमालाची विल्हेवाट आपल्या अखत्यारीतील अटी व शर्तीनुसार करण्यास पोलिसांची काहीही हरकत नाही, असे नमुद केले आहे.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक १२/०३/२०१३ रोजी मे. वेलानी ॲण्ड कंपनी, ८०, जीवराज भानजी शाह मार्ग, खडक, मुंबई ४०० ००९ यांचे परवाना क्र. ३ अ १९ (खाद्यतेल) तसेच ३ अ २० (वनस्पती) या परवानाधारकाची तपासणी करावयाची असल्याने उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ, परेल यांचे अधिपत्याखालील अधिकारी/

कर्मचारी पंचासह उपरोक्त पत्त्यावर जात असताना, ६०, जीवराज भानजी शाह मार्ग, खडक, मुंबई ४०० ००९ या दुकानात खाद्यतेलाची ने-आण सुरु असल्याचे दिसून आल्यावरुन अधिकाऱ्यांनी सदर दुकानात भेट दिली. संबंधीत आरोपीतांनी त्यांचे खाद्यतेलाच्या व्यवसायाच्या दरम्यान विनापरवाना असलेल्या जागेत तसेच योग्य त्या ठिकाणी साठा न करता अन्य ठिकाणी साठा ठेऊन कार्यालय स्थापन न करता खरेदी विक्रीचा व्यवसाय केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याने, संबंधिताविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० तसेच महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ चे खंड ०४(२), २(अ), २(ब), ३(१), अबकड ४(१), (२), १२, १३ च्या तरतुदींचा तसेच सदर आदेशान्वये देण्यात आलेल्या परवान्यामधील अटी व शर्तीचा भंग केल्याने, डोंगरी पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.क्र. ०९/२०१३, दिनांक १३/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन एकूण ७,८४,८१०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२३२० (ई), दिनांक २७/०९/२०१२ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१३ पर्यंत निर्बंध आहेत.

महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ अन्वये देण्यात येणाऱ्या घाऊक परवानामधील "अट क्रमांक २(अ) नुसार अनुज्ञप्तीधारक उपरोक्त व्यवसाय परवानामधील नमुद जागेत व्यवसाय करण्याबाबत" सुचित केले असुन, अट क्रमांक २(ब) नुसार "अनुज्ञप्तीधारक ज्याला उपरोक्त धंदा चालवावयाचा आहे. अनुसुचित वस्तुचा परवानामध्ये उल्लेखिलेल्या गोदामांव्यतिरीक्त इतर कोणत्याही ठिकाणी साठवणुक न करण्याबाबत" नमुद आहे. तसेच "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविले पाहीजे व अनुज्ञाप्ती, बदल करण्यासाठी, अनुज्ञाप्ती प्राधिकरणाला सादर केली पाहिजे " असे स्पष्ट नमुद केले आहे.

मे. वेलानी अँड कंपनीचे मालक यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांचा ६०, जीवराज भानजी शाह मार्ग, खडक, मुंबई ४०० ००९ या प्रशासकीय कार्यालयात असलेल्या मोकळ्या जागेत विविध खाद्यतेलाचा साठा जप्त असल्याचे सांगून त्यांनी धारण केलेला खाद्यतेल/वनस्पतीचा घाऊक परवाना हा ८०, जीवराज भानजी शाह मार्ग, खडक, मुंबई ४०० ००९ या पत्त्यावर असल्याचे सांगून सदर परवान्यावर वेगळ्या गोदामाची नोंद नसून परवान्यावरील पत्त्यावर खाद्यतेलाच्या साठ्याची नासधुस होऊ नये. म्हणून त्यांनी परवान्यावरील पत्त्याव्यतिरिक्त इतर ठिकाणी साठवणूक केल्याचे सांगितले. सदरची चुक त्यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबात तसेच सुनावणीच्या

वेळी कबूल केले आहे. निवेदनासोबत नमुद साठामालकाने धारण केलेला घाऊक परवाना तसेच सादर केलेल्या साठ्यांच्या खरेदी बिलांच्या छायांकीत प्रतींचे अवलोकन करता महाराष्ट्र अनुसुचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये त्यांनी खाद्यतेल व वनस्पतीच्या व्यवसायाकरीता घाऊक परवाना घेतला असुन सदर परवान्यावर वेगळया गोदामांची नोंद निरंक असल्याचे दिसुन येते. नमुद परवानाधारकांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे असुन शासनाची दिशाभुल करणारे आहे. अनुज्ञप्तीमधील अटीनुसार "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविणे बंधनकारक आहे." तथापी, मे. वेलानी अँड कंपनीचे मालक या साठामालकाने उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ, परेल या अनुज्ञप्तीप्राधिकारी यांच्या कार्यालयात ६०, जीवराज भानजी शाह मार्ग, खडक, मुंबई ४०० ००९ या गोदामात त्यांचा विविध खाद्यतेलाचा साठा ठेवल्याबाबतचे सुचनापत्र सादर न केल्याचे दिसुन येते. तसेच सदर साठा मालकाने नमुद गोदामामध्ये साठवणुक केल्याबाबतचे सुचनापत्र उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ, परेल यांच्या कार्यालयात सादर न केल्याचे दिसून येत आहे. सबब, मे. वेलानी अँड कंपनीचे मालक यांनी त्यांच्या परवान्यावरील नमुद पत्याव्यतिरीक्त अन्य ठिकाणी साठवणुक केल्याचे सुचनापत्र अथवा परवान्यावर गोदामाची नोंद करुन न घेतल्याने त्यांनी महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ अन्वये त्यांना देण्यात आलेल्या परवानामधील तरतुदींचा व त्यामधील अटी/शर्तीचा तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चा भंग केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचा जप्त करण्यात आलेला विविध खाद्यतेलाचा संपुर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये डोंगरी पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.क्र. ०९/२०१३, दिनांक १३/०३/२०१३ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या ४३७ बरणे/डब्यांमधील विविध खाद्यतेलाचा एकुण ६,२४१ लिटर साठा हा शासनजमा करण्यात यावा.

२) उक्त शासनजमा करण्यात आलेला खाद्यतेलाचा साठा हा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ, परेल (दुरध्वनी क्र. ०२२-२४१५७५६०/७९/९२) यांचे मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

मे. वेलानी अँड कंपनीचे भागीदार सिराज हसनअली वेलानी
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, डोंगरी पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, डोंगरी पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ, परेल यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.
५) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING AND DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.